मराठवाडा पॅकेजच्या धर्तीवर पहिल्या टप्यात उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया व सातारा आणि दुस-या टप्यात बीड व भंडारा या जिल्ह्यांमध्ये २० शेळ्या + २ बोकड असा शेळी गट वाटप करणे ही योजना सन २०१७-१८ पासून राबविण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन पुरकपत्र क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र. २३८/पदुम-४,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ८ फेब्रुवारी, २०१८

वाचा :- १. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.२३८/पदुम-४, दि.१६ नोव्हेंबर, २०१७.
२. शासन शुध्दीपत्रक क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.२३८/पदुम-४, दि.१७ नोव्हेंबर, २०१७.

शासन पुरकपत्र :-

वाचा १ येथील दि.१६.११.२०१७ च्या शासन निर्णयातील पृ.क्र.२ वरील योजनेअंतर्गत देय अनुदान या खालील तक्त्यानंतर खालीलप्रमाणे वाचावे.

या योजनेअंतर्गत सन २०१८-१९ मध्ये पहिल्या टप्यात उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया व सातारा या चार जिल्ह्यांमध्ये तर, सन २०१९-२० मध्ये दुस-या टप्यात बीड व भंडारा या दोन जिल्हयांमध्ये प्रति जिल्हा एकूण १००० लाभार्थ्यांना २० शेळ्या + २ बोकड असा शेळी गट वाटप करण्यात यावे.

सदरचा शासन पूरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असुन त्याचा संकेतांक क्र. २०१८०२०८१२३३३१४३०१ आहे. सदर शासन पूरकपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

Shri Ravindra Gurav

Digitally signed by Shri Ravindra Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, cn=Shri Ravindra Gurav
Date: 2018.02.08 12:40:27 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२.
२. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२.

३. मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२.
४. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-७.
५. विभागीय आयुक्त, संबंधित.
६. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया, सातारा, बीड व भंडारा
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया, सातारा, बीड व भंडारा
८. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
९. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१०.व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, गोखलेनगर, पुणे.
११.प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, (सर्व).
१२.जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया, सातारा, बीड व भंडारा
१३.जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया, सातारा, बीड व भंडारा
१४.निवड नस्ती (पदुम-४)